**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ७२/२०२१ मधील निशाणी क्र. २१ वरील आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. २ यांनी 'कैफियत नाही' चा आदेश रद्द होवून कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादी यांचे अर्जातील कथनानुसार, त्यांचे वडील गंभीर आजारी असल्यामूळे मा. न्यायालयात येऊन लेखी जबाब दाखल करू शकले नाही. त्यामूळे सदर कैफियत दाखल करण्यास झालेला उशीर माफ करुन त्यांच्या विरुध्द पारीत करण्यात आलेला 'कैफियत नाही' चा आदेश रद्द करण्याविषयी त्यांनी विनंती केली आहे.

०३. वादी यांनी आपले म्हणणे देवून प्रस्तुत अर्जास हरकत असल्याचे सांगून अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

०४. प्रस्तुतचा अर्ज त्यावरील शपथपत्र व म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादी क्र. २ यांचे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रतिवादी यांना समन्सची बजावणी झाल्यापासून किमान ९० दिवसांचे आत कैफीयत देणे आवश्यक होते. परंतु, कैफियत दाखल करणेसाठी विलंब झाल्याचे दिसून येत आहे. प्रतिवादी क्र. २ यांनी अर्जामध्ये कैफियत देणेस उशीर झालेचे कथन केले आहे. सबब, अर्जात नमुद कारण हे संयुक्तिक दिसून येत नाही. परंतु, प्रस्तुतचा दावा हा गुणदोषावर चालविण्याकरीता प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर घेणे न्यायोचित होईल. प्रस्तुतची कैफियत विलंब माफ करुन अभिलेखावर घेतलेस वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. परंतु, विलंब माफ करुन कैफियत अभिलेखावर न घेतलेस प्रतिवादी यांचे नुकसान होवू शकते. सबब, सदरचा अर्ज खर्चासह मंजूर करणे न्यायोचीत होईल. यास्तव पुढीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

०१. प्रतिवादी क्र. २ यांचे विरुध्द झालेला दावा विना कैफियत चालविण्याचा आदेश रद्द करण्यात येतो. तसेच, कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येत आहे.

०२. प्रतिवादी क्र. २ यांनी सदर अर्जाचा खर्च रक्कम रूपये २००/- (दोनशे रूपये) तालूका विधी सेवा समिती, भोकरदन येथे जमा करावे.

स्वाक्षरित/-

दिनांकः ०१.१२.२०२२ (आर. व्ही. पाटील)
भोकरदन. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
भोकरदन.

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्राप्रमाणे आहे.

लघूलेखकाचे नावः यु. आर. दसरे
न्यायालयाने नावः दिवाणी न्यायालय क. स्तर भोकरदन
मा. साहेबांनी चेक केले
व पी.डी.एफ. दिनांकः ०१.१२.२०२२

स्वाक्षरित/-
लघुलेखकाची सही